



दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ३०५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१६ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# कोकणवासियांचा रेल्वे प्रवास सुखकर होणार!

## २६३ किमी लांब मार्गाचं दुपदरीकरण होणार; प्रस्ताव सादर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** कोकण रेल्वेच्या विस्ताराची कोकणवासी गेली अनेक वर्ष प्रतीक्षा करत आहेत. आता कोकणवासियांचं स्वप्न सत्यात उतरणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणावर काम सुरू होणार आहे. तब्बल २६३ किलोमीटर लांब मार्गावर दुपदरीकरण, तीन नवीन रेल्वे स्थानक आणि अतिरिक्त लूप मार्गांचा विकास करण्याची योजना आहे. यामुळे कोकण रेल्वेचा महाविस्तार होणार आहे.



**नेमका प्रकल्प काय?**

कोकण रेल्वेच्या विस्तारासाठी पाच वर्षीय प्लॅन तयार केला गेला आहे. यासाठी एकूण ४७०.०८ कोटींचा खर्च अपेक्षित असून रेल्वे बोर्डाकडे याचा प्रस्ताव पाठवला आहे अशी महिती कोकण रेल्वेचे संचालक आणि व्यवस्थापक संतोष कुमार झा यांनी 'मिड-डे'सोबत बोलताना दिली. रायगड जिल्ह्यातील रोह्यापासून ते कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्ह्यातील ठोकूरदरम्यान ७४० किमी लांब मार्गावरील कोंडी फोडण्याच्या हेतूने हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

ठोकूर ते मुकंबिका रोड-ब्यनदूर या मार्गावर ११२ किमी तर वैभववाडी ते माजोर्डा या मार्गावर १५१ किमी असं एकत्र २६३ किलोमीटर मार्गावर दुपदरीकरण करण्यात येणार आहे. रोहा-मडगाव पट्ट्यावर क्षमतेपेक्षा १४३ टक्के तर मडगाव ते ठोकूर पट्ट्यावर क्षमतेपेक्षा १२८ टक्के अधिक प्रवासी प्रवास करतात असं एका नोव्हेंबर २०२५मध्ये झालेल्या सर्वे क्षणात समोर आलं होतं. त्यामुळे या मार्गाचं दुपदरीकरण करण्याची योजना तयार केली. या प्रकल्पाचा प्रस्ताव सादर केला असून जून ३०पर्यंत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. आतापर्यंत कोकण रेल्वे मार्गावर केवळ ५४.६६ किमी मार्गा दुपदरीकरण करण्यात आलं आहे.

**तीन नवीन स्थानकं कुठे?**

मायेम, मुकंबिाका रोड-ब्यनदूर आणि न्यूरा-ओ-ग्रान्डे या ठिकाणी तीन नवी क्रॉसिंग स्थानकं बांधण्याचा प्रस्ताव आहे. त्यासह गोकर्णा मार्ग, होन्नावर,बरकूर, उडुपी, अंकोला या ठिकाणी लूप मार्गिका तयार करण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी एकूण ६९६.७७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून कोकण रेल्वे मार्गावरील गर्दी आणि कोंडी कमी करण्यात यश येण्याची शक्यता आहे.

याशिवाय मुंबई-गोवा वंदे भारत ट्रेनचे डबे वाढवण्याचाही प्रस्ताव आहे. या ट्रेनसाठी मोटी डिमांड आहे अशी माहिती झा यांनी 'मिड डे' ला दिली. वंदे भारत ट्रेनसध्या आठ डब्यांची आहे. मुंबई लोकलहूनही कमी डबे असलेल्या या ट्रेनमधून प्रवासी मोठ्या संख्येने प्रावस करतात. त्यामुळे या मार्गावर एक्सप्रेसची क्षमता वाढवण्याची गरज आहे.

याशिवाय या मार्गावर ११ लेवल-क्रॉसिंग गेट, ४८ स्थानकांवर विद्युत इंटरलॉकिंग प्रणाली आणि कवच प्रणालीही विकसित केली जाणार आहे. यामुळे कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

# ओबीसी समाजा, आता तरी जागे व्हा; हक्कासाठी २८ जूनला चंद्रपूरच्या महामोर्चात सहभागी व्हा

**अक्षराज : नितेश पाटील**



**दि.१५, चिमूर (चंद्रपूर) :** ग्रामपंचायत निवडणुकीतील सदस्य आरक्षणात ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व नगण्य होत असताना समाजातील शांतता ही चिंतेची बाब असल्याचे मत राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचे विदर्भ उपाध्यक्ष श्रीहरी सातपुते यांनी व्यक्त केले आहे.

ते म्हणाले की, आज आपण आपल्या हक्कांबाबत जागे झालो नाही, तर उद्या येणाऱ्या पिढीला त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते. आपल्या अधिकारांवर परिणाम होत असताना गप्प बसून चालणार नाही. आता झोपेचे सोंग सोडून संघटित होण्याची वेळ आली आहे. ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या समोर येण्यासाठी जातनिहाय जनगणना ही काळाची गरज असून, त्याशिवाय सामाजिक न्यायाचे योग्य नियोजन शक्य नाही. त्यामुळे प्रत्येक ओबीसी बांधवाने आपल्या हक्क, प्रतिनिधित्व आणि आरक्षणाच्या संरक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले.

ओबीसींच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि जातनिहाय जनगणनेच्या समर्थनार्थ रविवार दिनांक २८ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता चंद्रपूर येथे गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात युवक, महिला, विद्यार्थी, शेतकरी आणि सर्व ओबीसी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपली ताकद दाखवावी, असे आवाहन श्रीहरी सुभाषराव सातपुते यांनी केले आहे.

हक्क मागून मिळत नाहीत, त्यासाठी जागरूकता आणि संघटित संघर्ष करावा लागतो. आता शांत बसण्याची नाही, तर आपल्या अस्तित्वासाठी उभे राहण्याची वेळ आली आहे. असेही ते म्हणाले.

# महामार्ग उखडला, प्रश्न अनुत्तरित; गुणवत्तेच्या चौकशीची मागणी जोरात

**अक्षराज : संतोष बांदूरकर**




**दि.१५, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** चंद्रपूर-गोंडपिपरी मार्गावरील बामणी ते गोंडपिपरी हा रस्ता सध्या वाहनचालकांसाठी अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. या मार्गावरून प्रवास करताना, विशेषतः दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. गेल्या काही काळात या रस्त्यावर अनेक किरकोळ तसेच गंभीर अपघात घडले असून अनेक कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्याची आज झालेली दुरवस्था नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण करत आहे. रस्ता पूर्ण होऊन अवघी काही वर्षे लोटली असतानाच अनेक ठिकाणी सिमेंट काँक्रीटचा थर उखडला आहे. मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसाळ्यात ही परिस्थिती अधिकच गंभीर बनते. खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग अत्यंत धोकादायक ठरत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, या मार्गाची दुर्दशा होण्यामागे सुरजागढ लोहखनिज प्रकल्पाशी संबंधित अवजड वाहतूक हे प्रमुख कारण आहे. सुरजागढ खाणीतून दररोज शेकडो ट्रक या मार्गावरून धावतात. दिवस-रात्र सुरू असलेल्या या अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर प्रचंड ताण निर्माण होत असून त्याचा थेट परिणाम रस्त्याच्या गुणवत्तेवर झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. अवजड वाहनांची वाढती संख्या, काही वाहनांचा भरधाव वेग आणि उखडलेला रस्ता या त्रिसूत्रीमुळे अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. अनेक गंभीर अपघातांमध्ये नागरिकांना जीव गमवावा लागला असून अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ रस्त्याच्या दुरुस्तीचा मुद्दा म्हणून न पाहता सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेला सिमेंट काँक्रीट रस्ता जर काही वर्षांतच उखडत असेल, तर त्याच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. रस्ता बांधताना भविष्यात सुरजागढ प्रकल्पामुळे वाढणाऱ्या अवजड वाहतुकीचा योग्य अभ्यास आणि तांत्रिक नियोजन करण्यात आले होते का, हा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

तसेच या मार्गावर धावणारी अवजड वाहने निर्धारित वजनमर्यादेपेक्षा अधिक मालवाहतूक करीत आहेत का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे. वजन नियंत्रण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत आहे का, याचाही तपास होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रस्त्याच्या देखभाल कालावधीत संबंधित कंत्राटदाराने आवश्यक दुरुस्ती आणि देखभाल वेळेत का केली नाही, हा आहे. जर रस्ता निकृष्ट दर्जाचा बांधण्यात आला असेल तर संबंधित कंत्राटदार, तांत्रिक अधिकारी आणि देखरेख करणाऱ्या यंत्रणांवर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, अवजड वाहनांच्या अतिरेकामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचे मानावे लागेल. शासनाचा निधी हा जनतेच्या करातून उभा राहणारा पैसा असल्याने कोट्यवधी रुपयांचा रस्ता अल्पावधीतच खराब होणे ही गंभीर बाब आहे. यामुळे सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी करून दोषींवर योग्य कारवाई करण्यात यावी, तसेच रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित प्रवासाची हमी द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# तांदुळवाडी अपघात : ८ भाविकांचा बळी, सरकारचा कंत्राटदाराला दणका

## 'रोडवेज कन्स्ट्रक्शन'चे नवज्योत गडाख यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपूर :** म्हसवड-पंढरपूर महामार्गावरील तांदुळवाडीजवळ रविवारी घडलेल्या भीषण अपघातात पंढरपूर येथील बावचे कुटुंबातील ५ सदस्यांसह ८ जणांचा मृत्यू झाला. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळेच हा अपघात घडल्याचा आरोप होत असून, राज्य शासनाने कठोर पाऊल उचलत रस्त्याचे कंत्राटदार 'रोडवेज कन्स्ट्रक्शन'चे नवज्योत गडाख यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे कंत्राटदार वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अपघाताला रस्त्याचे ठेकेदार 'रोडवेज कन्स्ट्रक्शन'ला जबाबदार धरत नवज्योत गडाख यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला. एखाद्या अपघाताला जबाबदार धरून रस्त्याच्या कंत्राटदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने कंत्राटदार वर्तुळात खळबळ उडाली आहे.



पंढरपूर येथील बावचे कुटुंबीय आणि नातेवाईक मिळून १४ जण एका पिकअपमधून देवदर्शनासाठी म्हसवड येथे गेले होते. दर्शन आटोपून दुपारी परतीच्या प्रवासाला निघाले असता तांदुळवाडीजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि पिकअप थेट रस्त्यालगतच्या पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळली. या अपघातात बावचे कुटुंबातील ५ सदस्यांसह ८ जणांचा मृत्यू झाला, तर ६ जण जखमी झाले. सुदैवाने ७ जणांचे प्राण वाचविण्यात यश आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**'आम्ही आधीच इशारा दिला होता' – विहीर मालक**

विहीर मालक रामकृष्ण कदम यांनी माध्यमांना सांगितले, रोडवेज सोल्यूशन कंपनीने रस्ता तयार करताना उंची खूप वाढवली आणि आमच्या जमिनी व विहीर खाली राहिल्या. रस्ता उंचावल्यामुळे गाड्या थेट विहिरीत जाऊ शकतात, हे ओळखून आम्ही त्याचवेळी मजबूत संरक्षक भिंत बांधण्याची मागणी केली होती. प्रशासनाकडे कित्येकदा विनंत्या, अर्ज करूनही अधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेतले नाही. अपघातस्थळापासून १०० मीटरवर अशीच एक विहीर आहे. १५ दिवसांपूर्वीच एक पिकअप विहिरीत गेला होता. अशा घटना वारंवार घडताहेत, तक्रारी देतोय पण दखल घेतली जात नाही, असा संताप कदम यांनी व्यक्त केला.

# किराणा दुकानातून १५ लाख ३० हजार रुपयांची चोरी आरोपी २४ तासात जेरबंद

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** सोनापूर येथील एका किराणा दुकानाचे दार तोडून दुकानातील १५ लाख ३० हजार रुपयांची रोख रक्कम चोरी करुन तेलंगणात पळून गेलेल्या आरोपीला २४ तासात मुद्देमालासह लाठी पोलिसांनी अटक केली.

गोंडपिपरी तालुक्यातील सोनापूर येथील समीर अरुण चौमटेवार यांचे किराणा दुकानाचे रात्री दार तोडून दुकानात प्रवेश केला व दुकानातील ड्रॉवरमधील ३० हजार आणि कापडी बॅगेतील ३० लाख असे एकूण १५ लाख ३० हजार रुपयांची चोरी झालेयाची तक्रार लाठी पोलीस ठाण्यात देण्यात आली.

लगेच प्रभारी ठाणेदार सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत पवार यांनी पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहचून निरीक्षण केले. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी आशिष जानकीराम चौधरी चोरी करताना स्पष्टपणे दिसून आले.

गुन्हा उघडकीस येताच तात्काळ तपासचक्रे फिरवून आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची दोन पथके तयार करण्यात आले. एक पथक तेलंगणा व दुसरे पथक गडचिरोली येथे रवाना करण्यात आले. तपासादरम्यान आरोपीचे हालचालीबाबत तांत्रिक माहिती व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी तेलंगणा राज्यात असल्याचे खात्री झाली त्यानंतर लाठी पोलीस ठाण्यातील पथक रवाना झाले.

दरम्यान, चंद्रपूर येथील स्थानिक



गुन्हे शाखा यांचे पथकही मदतीसाठी दाखल झाले. स्थानिक गुन्हे शाखा आणि लाठी पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त कारवाईत आरोपी आशिष जानकीराम चौधरी यास तेलंगणा राज्यातून मोठ्या शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पवार यांनी अटक करुन पुढील तपास सुरु केला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनात लाठी पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत पवार आणि त्यांचे पोलीस कर्मचारी तसेच चंद्रपूर येथील स्थानिक गुन्हे शाखा कर्मचारी यांनी केली आहे.

अक्षराज






## मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यम वर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

– श्याम ठाणेदार

# अधिक–मासातील कुप्रथांचा त्याग करा

अधिक मासात जावयाला घरी बोलावून सन्मान करण्याची प्रथा ही महाराष्ट्रासह काही प्रदेशांतील लोकपरंपरा आहे. उपलब्ध धार्मिक ग्रंथांच्या आधारे पाहिले असता, स्कंद पुराण, पद्म पुराण, नारद पुराण किंवा भविष्योत्तर पुराण यांमध्ये अधिक मासाचे माहात्म्य, व्रत, दान, जप, उपवास आणि भगवान विष्णू (पुरुषोत्तम) यांची उपासना यांचा उल्लेख आढळतो; परंतु अधिक मासात जावयाचा सन्मान करावा किंवा जावयाचे वाण द्यावे, असा स्पष्ट उल्लेख पुराणांमध्ये आढळत नाही.अधिक मासाशी संबंधित पुराणांमध्ये प्रामुख्याने पुढील गोष्टींवर भर दिला आहे.भगवान विष्णू/पुरुषोत्तम यांची भक्ती.दान, जप, पारायण आणि सत्कर्म. गरजूंना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्मकरण्याचे सांगितले आहे.मग हा अट्टहास कशासाठी?

संत,महात्मे, समाजसुधारक यांनी आपल्याला ह्याच रूढी परंपरेवर घाला घालण्यासाठी शिकवले.आपण ते पुस्तकात वाचतोसुद्धा..!अहो! एवढेच काय, इयत्ता पाहिलेपासून आपल्याला पाठ्यपुस्तकातून शिकवल्या जाते. शालांत परीक्षेत प्रश्नही विचारले जातात.एवढं सर्व आकलन करुन परीक्षा देऊन,या बुरसट चालीरितींना खत पाणी घालण्यास सुशिक्षित वर्ग सध्या अग्रेसर आहे.खोट्या प्रतिष्टेसाठी,मान सन्मानासाठी मेंढीवळणासारखं हजारो लाखो रुपयांचा चुराडा होतोय, कितीतरी मुलींचे बापमाणूस वडील कर्जबाजरी होतं आहे.आपण एकीकडे बघतो नेमकं हा महिना पावसाळ्याच्या तोंडी येतो,पेरणी पूर्व मशागतीची वेळ असते.शेतकरी वर्गाला नांगरणी वखरणी तथा बी–बियाणे खरेदि करण्यासाठी पैशाची निकड भासत असते तर दुसऱ्या बाजूला या लोकरूढी कीं ज्याना कुठेही शास्त्राचा आधार नाही त्यावर होणारा खर्च यामुळे तो बिच्चारा आर्थिक विवंचनेत सापडतो. कर्जबाजारी होऊन त्याच्यावर आत्महत्येची पाळी येते.

सध्या समाजातील एक विकृती प्रकर्षाने येथे उल्लेखित करावाशी वाटते. स्टेटस आम्ही अधिक मासात जावयासाठी केलेलं जावई दान किंवा वाण हे स्टेटस ठेवून नेमकं काय सिद्ध करायचं? हा बडेजाव कश्यासाठी?एकमेकांना दाखण्यासाठी...!मित्रांनो,आपण धार्मिक ग्रंथाना, वेद, पुरानांना परमात्म्याचे वाड:मयीन रूप मानतो.मग पुराणानुसार या मासात भगवान विष्णुची आराधना कोणी केली,दान, जप, पारायण सत्कर्म तथा गरजूंना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्म कोणी केले? नाही ना...! अर्थात आपण धर्माची मूळ शिकवण




उपदेश बाजूला ठेवून भरकत चाललोय. काळ बदलत चालला आहे.धर्मावर होणारे अन्याय–आत्याचार थांबत नाहीये. माणूस म्हणून माणसासोबत वागायला तयार नाही. एकवेळी अशिक्षित समाजाने या गोष्टी केल्या तर आपण म्हणूयात कीं, त्यांनी मागील पिढीने जसं सांगितलं तसं वर्षानुवर्षं केलं .हो मान्य आहे, त्यांनी केलंही यात शंका नाही. तो काळ वेगळा होता. दळवळणाची साधने नव्हती. लेकीच्या लग्नानंतर वर्ष–वर्षभर बाप–लेक, माय–लेक बहीण– भाऊ एकमेकांना भेटत नव्हते, म्हणून या अधिक मासाच्या निमित्ताने नातेसंबंध दृढहोण्यास मदत व्हायची.मात्र हल्ली, सर्व सुविधा उपलब्ध आहेत.दळवळणाची साधने, भ्रमनध्वनीच्या माध्यमातून वार्तालाप तथा व्हिडिओ कॉल वगैरे ह्या सर्व घडामोडी आहेतच. यातून सर्व जग जवळ आले मात्र एकमेकांप्रति आपुलकी कुठे? मग ह्या चालीरिती,या बुरसट रूढी परंपरा यांना खत पाणी कश्यासाठी? केवळ दिखावा म्हणून कीं मुलींच्या आई वडीलांचं दिवाळं काढण्यासाठी? म्हणून तरुण सुशिक्षित मित्र मंडीळींनो तुम्हि या गोष्टी टाळा.इतरांना सांगा. या अधिक मासाचे खरं महत्व समाजाला पटवून द्या.या मासाचा मूळ उपदेश तथा शिकवण जशी कीं, ईश–भक्ती करा. गोर–गरीब,गरजू मुलांना शालेय वस्तूंची भेट द्या. गरजवतांना अन्नदान, वस्त्रदान इत्यादी पुण्यकर्म करा.व येणाऱ्या पिढीसाठी एक आदर्श उभा करा.

जर ही प्रथा केवळ एक प्रेमभेट , स्नेह आणि स्वेच्छेने जावयाचा व मुलीचा सन्मान करण्यापुरती मर्यादित असेल तो एक भावनिक बंध ठरेल, परंतु जर त्यातून आर्थिक भार, हुंड्यासारखी अपेक्षा, सक्ती, दिखाऊपणा किंवा मुलीच्या माहेरच्या कुटुंबावर अनावश्यक दबाव निर्माण होत असेल, तर अशा स्वरूपातील प्रथा कुप्रथा ठरेल,म्हणून अश्या या अधिक मासातील जावयाचा सन्मान व वाण अश्या या कु–प्रथांचा त्याग करा कीं, ज्यांचा पुराणात कुठेही उल्लेख नाही.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

# अनाकलनीय 'बोटचेपी' भुमिका

डोनाल्ड ट्रंप हे अमेरिकेचे दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून ते ज्या पद्धतीने वागत आहेत, बोलत आहे ते निश्चितच महाशक्ती असलेल्या देशाच्या नेत्याला शोभणारे नाही. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताच त्यांनी 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' (मागा) चा नारा दिला मात्र त्यासाठी ते जगाला वेठीस धरत आहेत. जगातील इतर देशाबरोबर बॅलन्स ऑफ ट्रेड साधण्यासाठी त्यांनी मनमानी पद्धतीने टेरिफ कर लादण्याचा वारंवार प्रयत्न केला अनेकदा अमेरिकन कोर्टाने त्यांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. गेल्या वर्षी त्यांनी नाहक ईस्त्रायलच्या नादाला लागून अमेरिकेबरोबर पंगा घेतला मात्र त्यावेळी धडा घेऊन ही या वर्षी २८ फेब्रुवारी पासुन आखाती युद्धाची ठिणगी पडली आणि त्याला कारणीभूत अमेरिका ठरली. आपणच जगाचा पोलीस असल्याच्या आविर्भावात अमेरिका कायमच वागत आली आहे आतातर ते अधिक ठळकपणे अधोरेखित होत आहे, मात्र इराण–ईस्त्रायल युद्धाच्या निमित्ताने ईराण ने अमेरिकेला त्यांची खरी जागा दाखवून दिली आहे त्यामुळेच ट्रम्प यांच्या बाबत हात दाखवून अवलक्षण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या निमित्ताने ईराण ने राष्ट्रवाद कसा असावा आणि कुठल्याही महाशक्ती विरोधात नमते न घेता कसा लढा द्यावा याचा परिपाठ खालुन दिला आहे. युद्धाच्या सुरवातीलाच इराणचे सर्वोच चाळीस नेते मारले गेले, एका शाळेवर ईस्त्रायल ने अमानुषतेचा कळस गाठत हल्ला करत शंभराच्या वर शालेय विद्यार्थ्यांचा जीव घेतला, ईराण सैन्याचे मोठे नुकसान झाले तरी ईराण तसुभरही झुकला नाही याऊलट ट्रम्प यांचा तोरा ऊतरविला.

या सगळ्यात आजवर कधी नव्हे एवढे भारताबाबत अमेरिका, डोनाल्ड ट्रंप यांचे धोरण हे भारतासाठी चिंतेची बाब ठरत आहेत, टेरिफ कर लावतांना सर्वात जास्त कर भारतावर लावला, नंतर त्यात कमी अधिक बदल झाले मात्र तरीही अगोदरपेक्षा जास्तच टेरिफ कर लावला जात आहे. त्याच बरोबर गेल्या वर्षी झालेल्या ऑपरेशन सिंदुर च्या वेळी भारताची बाजू मजबुत असतांना, भारतीय लष्कर निर्णायक लढाई लढत असतांना अनपेक्षितपणे डोनाल्ड ट्रंप यांनी दोन्ही देशांमधील शस्त्र संधीची घोषणा अगोदर केली आणि भारताने ती निमुटपणे मान्य देखील केली. आजवर जागतिक व्यापारात केवळ भारताबरोबरच आपण फायद्यात होतो मात्र डोनाल्ड ट्रंप यांनी भारतावर टेरिफ कर लावत भारताकडून आयात



कमी केली आणि भारताला अमेरिकेकडुन मोठ्याप्रमाणावर आयात करावी लागणार हे स्पष्ट केले या बाबत अमेरिकेकडुन वारंवार अनेकदा वक्तव्ये येत असुनही भारताकडून मात्र चोख प्रत्युत्तर दिले जात नाही. सर्वात गंभीर बाब म्हणजे गेल्या काही दिवसांत तीनदा भारतीय मालवाहतूक जहाजावर हल्ले झाले त्यात तीन भारतीयांचा मृत्यू झाला तरी भारत ठोस भुमिका घेत नाही कि करारा जबाव देत नाही. अमेरिका परवानगी देईल तेव्हा रशिया कडुन तेल खरेदी करायची, अमेरिकेने आदेश दिला म्हणून व्हेनेझुऐला, अमेरिकेकडुनच महागडी ईंधन खरेदी करायची. युद्धाभ्यासासाठी भारतात आलेल्या इराणच्या जहाजावर अमेरिकेने हल्ला केला तरी भारताकडून कुठलीही तीव्र प्रतिक्रिया दिली नाही.अमेरिकेबरोबर होऊ घातलेल्या व्यापारी करारात भारत तोट्याचा व्यवहार करणार हे स्पष्ट आहे. टेरिफ कर बाबत अमेरिका म्हणेल ते मान्य अशी भारताची भुमिका. घर मे घुसकर ची भाषा केवळ पाकिस्तान बाबत केली जाते. डोनाल्ड ट्रंप यांनी जगातील इतर देशांवर मनमानी पद्धतीने कर लावले तेव्हा अनेक देशांनी अगदी युरोपियन युनियन देशांनी देखील अमेरिकेला जुमानले नाही, मात्र भारत कुठल्याच बाबतीत चकार शब्द काढत नाही कि विरोध करत नाही. आखाती युद्धाच्या निमित्ताने नाहक ईराण, रशिया देशांशी संबध दुरावुन अमेरिकेशी जवळक साधुनही अमेरिका मात्र भारताबाबत कठोरपणे वागत आहे.

अमेरिकन प्रशासनातील अधिकारी, खुद्द डोनाल्ड ट्रंप हे भारत तसेच भारताच्या सर्वोच्च नेत्यांबाबत सातत्याने अपमानास्पद, वादग्रस्त वक्तव्ये करत असतांना भारताकडून मात्र केवळ सोपस्कार म्हणून निषेध नोंदवला जातो कागदी घोडे नाचवले जातात या पलिकडे काही होत नाही. घर मे घुसकर ची भाषा केवळ पाकिस्तान बाबत होते, चीन, अमेरिका वारंवार आगळिक करत असतांनाही घर मे घुसकर ची भाषा तर सोडाच पण ठणकावून सांगण्याची हिम्मत दाखवली जात नाही.अमेरिकेची भारताबाबतची भुमिका बिग बॉस सारखी असल्याचे वारंवार अधोरेखित होत आहे, ट्रम्प यांनी वारंवार भारताच्या सर्वोच्च नेत्यांबाबत अनेक वक्तव्य केली मात्र विश्वगुरु काही बोलायला तयार नाही. वारंवार छप्पन इंची छाती, विश्वगुरु, महाशक्तीचा दावा केला जातो मात्र देशाचा सर्वोच्च नेता ठोस भूमिका घेतांना वा कडक शब्दात इशारा देतांना का दिसत नाही हे अनाकलनीय आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

### रक्त निर्माण

मानवअत्यंत प्रगत
शोध लावी नवे नवे
नव निर्मिती आवडे
मिळवी जे हवे हवे

करू शके काहीही
दांभिक नेहमी दावे
ए आय चा विधाता
अहंकार प्रौढी दावे

रक्तनिर्माण कराया
आता सातत्ये धावे
यशमात्र मुळी न ये
प्रयास तो मनोभावे

रक्तनिर्मितीअशक्य
सत्य खरे हे जाणवे
विधाता हा सर्वश्रेष्ठ
शास्त्रज्ञसारे ओणवे

रक्तावीण अजूनही
कुणीतरी जाईजीवे
रक्तसाठा असेकमी
ऐन वेळी कुठे जावे

रक्त फॅक्टरी शरिरा
सतत नसनस भरवे
शुध्दीकरण प्रक्रिया
सशक्त रक्त ते बरवे

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# औषधांतील डॉक्टरांच्या कमिशनवर चाप बसायलाच हवा !

रुग्णालयांमध्ये ॲडमिट असलेल्या रुग्णांना औषधे आणि वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्याच आत असणाऱ्या अधिकृत मेडिकलमधून खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या रुग्णालयांना अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने मोठा दणका दिला आहे. 'रुग्णालयातील मेडिकलमधूनच औषध खरेदी करणे बंधनकारक नाही.

औषधे कुठून खरेदी करायची, हा सर्वस्वी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांचा अधिकार आहे,' असा महत्त्वपूर्ण आदेश एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जारी केला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी पत्रकार परिषदेत दिला. मुंढे यांच्या या आदेशाचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

रुग्णालयातील डॉक्टर आणि रुग्णालयातील मेडिकल स्टोअर यांचे साटेलोटे असते हे सर्वांनाच ठाऊक आहे. परस्परांच्या आर्थिक संबंधातून डॉक्टरांना मिळणाऱ्या कमिशनला



यामुळे चाप बसणार आहे. मात्र डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे किंवा वैद्यकीय साहित्य रुग्णालयाच्या बाहेरील परिसरात असलेल्या मेडिकल स्टोअर्समध्येही उपलब्ध असायला हवीत. बऱ्याचदा डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे ही त्यांनी सांगितलेल्या मेडिकल स्टोअरमध्येच उपलब्ध असतात.

अन्य मेडिकल स्टोअरमध्ये त्या औषधात अंतर्भूत असलेल्या घटकांची अन्य कंपनीची औषधे मिळतात मात्र त्याच कंपनीची मिळत नाहीत. अशावेळी औषधे घेण्यासाठी आलेल्या रुग्णाच्या नातेवाईकाची पंचाईत होते. अशी औषधे घेऊन गेल्यास डॉक्टर ती औषधे परत करण्यास सांगून लिहून दिलेली औषधेच घेऊन येण्यास सांगतात. यावरसुद्धा तोडगा काढण्याची गरज आहे.

डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे अनेकदा आधुनिक मात्र महाग असतात. त्या औषधातील अंतर्भूत घटक असलेली जेनेरिक औषधे किमतीने स्वस्त असतात, मात्र ही औषधे सुद्धा डॉक्टर स्वीकारत नाहीत. बऱ्याच रुग्णांना किंवा नातेवाईकांना या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान नसल्याने आणि आपला रुग्ण लवकरात लवकर बरा व्हावा हीच इच्छा असल्याने अधिकचे पैसे गेले तरी चालतील मात्र डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधेच घेऊन जाण्याकडे त्यांचा कल असतो. या संदर्भातही डॉक्टरांना आणि रुग्णालय प्रशासनाला ताकीद देणे गरजेचे आहे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# सोशल मिडीयाद्वारे खंडणी वसूल करणाऱ्या सिंडीकेटचा गुन्हे शाखेकडून पर्दाफाश



अक्षराज : सुनिल साखरकर

दि.१५, मुंबई : मुलुंड येथील एका व्यवसायिकास एका सोशल मिडीयावरील कार्यरत न्यूज चॅनेलचे संबंधित असल्याचे भासवून आपसात संगनमत करून फौजदारीपात्र कट रचून ते शासकीय यंत्रणेत असल्याचे भासवून व्यावसायिकाच्या दुकानातील दुग्धजन्य पदार्थ खराब असल्याचा खोटा व्हिडीओ बनवून सोशल मिडीयाद्वारे प्रसारीत करून त्यांचे दुकानाचे नाव खराब करून बदनामी करण्याची तसेच व्यवसाय बंद पडण्याची भिती दाखवून खंडणीची रक्कम ऑनलाईन स्वरूपात स्विकारून उर्वरीत रक्कम रोख स्वरूपात देण्याबाबत तक्रार गुन्हे शाखेस प्राप्त झाली होती.

नमूद माहितीच्या अनुषंगाने मा. वरिष्ठांच्या आदेशाने मुलुंड येथील सोनापूर सिग्नल परिसरात गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष-५ चे अधिकारी व अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने आरोपीस खंडणीची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यासाठी सापळा रचला होता. त्याअनुषगाने दिनांक १४/०६/२०२६ रोजी नमूद ठिकाणी ०१ इसम खंडणीची रक्कम स्विकारताना मिळून आला.

सदर बाबत मुलुंड पोलीस ठाणे, येथे गु.र.क्र. ७७८/२०२६ कलम ३०८(२), ३५१(१), २०४, ६१(१), ३(५) भा. न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हा पुढील तपासकामी गुन्हे शाखेस वर्ग करण्यात आलेला आहे. नमूद गुन्हयाचा तपास गु.प्र.शा. गु.र. क्र. ६८ / २०२६ अन्वये कक्ष -०५, गुन्हे शाखा, मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

दिनांक १५ जून २०२६ रोजी आरोपीत इसमास अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, ३७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे हजर करण्यात आले असता मा. न्यायालयाने दिनांक १८ जून २०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केलेले आहे.

अटक करण्यात आलेल्या इसमाचे वर्णन :- एक ४० वर्ष वयाचा इसम, धंदा रिलस्टार, रा. ठि. निर्मल लाइफस्टाइल एल.बी.एस रोड, मुलुंड, मुंबई.

सदरची प्रभावी कामगिरी गुन्हे शाखा, मुंबई पथकाने पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्ण कान्त उपाध्याय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रोशन व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक व कक्ष-५ मधील अधिकारी व अंमलदार यांनी यशस्वीपणे पार पाडली आहे.

# जि.प.शाळेचा कायापालट पाहून इतर गावांमध्येही सुटले बदलाचे वारे; त्रिवेणी सोहळा थाटात संपन्न



अक्षराज : जितेंद्र लिंगायत

दि.१५, गंगापूर (छ.संभाजीनगर) : एकविसाव्या शतकातील आधुनिक शिक्षणाची आव्हाने पेलण्यासाठी केवळ शासकीय निधीवर अवलंबून न राहता, गावाने एकजूट दाखवली तर जिल्हा परिषदेच्या शाळेचे रूपडे कसे पालटू शकते, याचे एक ज्वलंत आणि आदर्श उदाहरण गंगापूर तालुक्यातील सिद्धनाथ वाडगावने संपूर्ण महाराष्ट्रासमोर ठेवले आहे. येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी, म्हणजेच १५ जून २०२६ रोजी एक अभूतपूर्व, ऐतिहासिक आणि डोळे दिपवणारा 'त्रिवेणी सोहळा' अत्यंत उत्साहात व ऐतिहासिक थाटाम ाटात संपन्न झाला.

या सोहळ्यात एकाच वेळी नवोदित विद्यार्थ्यांचा 'शाळा प्रवेशोत्सव', नव्याने मंजूर झालेल्या 'इयत्ता ५ वीच्या वर्गाचा भव्य शुभारंभ' आणि लोकसहभागातून अत्यंत कमी कालावधीत साकारलेल्या 'स्मार्ट टीव्ही व अद्ययावत संगणक कक्षाचे लोकार्पण' करण्यात आले. सिद्धनाथ वाडगाव शाळेत झालेला हा हायटेक बदल सध्या संपूर्ण गंगापूर तालुक्यात आणि परिसरात प्रचंड चर्चेचा विषय बनला आहे. डिजिटल क्रांतीचा हा पॅटर्न पाहून इतर गावांतील नागरिकांम ध्येही कमालीचे कुतूहल निर्माण झाले असून, आपल्याही गावची शाळा अशीच 'स्मार्ट' व्हावी यासाठी तिथेही आता 'बदलाच्या वाऱ्यांची पेरणी' झाली आहे.

या विशेष आणि भव्य कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी गंगापूर तालुक्याचे कार्यक्षम गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुक्याचे गटविकास अधिकारी अनिलकुमार सकदेव, पंचायत समितीचे सन्माननीय सदस्य दादासाहेब जगताप, माजी जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती संतोष जाधव आणि विद्यमान जिल्हा परिषद सदस्या तथा बांधकाम समिती सदस्या सविताताई जाधव या दिग्गज नेत्यांची व वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. गावातील प्राथमिक शाळेच्या या उपक्रमाला लाभलेली प्रशासकीय व राजकीय नेत्यांची उपस्थिती ग्रामस्थांचा आणि शिक्षकांचा उत्साह वाढवणारी ठरली. सिद्धनाथ वाडगावच्या शाळेत झालेला हा हायटेक बदल सहजासहजी झालेला नाही, तर यामागे लोकचळवळीची मोठी ताकद आहे. गावातील प्रत्येकाने शाळेला आपली माऊली मानून सढळ हाताने मदत केली. विशेष म्हणजे, शिक्षणप्रेमी डॉ.अभिजित मुळे यांनी या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन आणि अंम लबजावणी करण्यासाठी आपली मोफत सेवा दिली, ज्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.ग्रामस्थांनी एकत्र येत स्वतःहून गोळा केलेल्या लोकवर्गणीतून २ अत्यंत आधुनिक अॅन्ड्रॉइड टीव्ही संच शाळेला भेट दिले. तसेच, ग्रामीण भागातील मुलांची संगणक शिकण्याची अडचण दूर व्हावी म्हणून संतोष पाटील जाधव यांनी आपल्या स्वखर्चातून २ अद्ययावत संगणक संच (ऊर्ीीशिॲ ड्शीी) शाळेला भेट देऊन या डिजिटल क्रांतीला मोठी ताकद दिली. आज उपस्थित म ान्यवरांच्या हस्ते या डिजिटल उपकरणांचे फित कापून लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे आता ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील चिमुकल्यांना ही आंतरराष्ट्रीय दर्जाचे हायटेक आणि डिजिटल शिक्षण मिळणे सुलभ होणार आहे.

**गणवेश, पुस्तके आणि वह्यांचे वाटप; चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद**

शाळेच्या पहिल्याच दिवशी हातात नवीन कोरी पुस्तके आणि संगणकाची सोबत पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. कार्यक्रम ाच्या पूर्वार्धात, प्राथमिक शाळेच्या अंगणात पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या इयत्ता पहिलीच्या चिमुकल्यांचे आणि नव्याने सुरू झालेल्या पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन, अत्यंत उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. याच सोहळ्याचे औचित्य साधून शासनामार्फत मिळणारे मोफत शालेय गणवेश, नवीन कोरी पाठ्यपुस्तके आणि वह्यांचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शैक्षणिक साहित्याचा हा संच हातात पडताच विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने न्हाऊन निघाले होते. गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून पाठीवर कौतुकाची थाप; अधिकाऱ्यांनी दिली स्वच्छतेची हमीकार्यक्रमाचे उत्कृष्ट आणि अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन शाळेचे सहशिक्षक सी.जी. वाघमारे यांनी केले, तर मुख्याध्यापक श्री.वाळुंज यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या प्रगतीचा अहवाल वाचून दाखवला आणि या डिजिटल उपक्रमाची पार्श्वभूमी मांडली. शिक्षकांच्या वतीने बोलताना वाघमारे सरांनी, तर पालक व ग्रामस्थांच्या वतीने जितेंद्र लिंगायत यांनी आपल्या मनोगतातून शाळेच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट उपसणाऱ्या आणि आर्थिक योगदान देणाऱ्या प्रत्येक हाताचे जाहीर आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे आणि इतर प्रमुख अतिथींनी शाळेच्या या नाविन्यपूर्ण आणि हायटेक उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. हा पॅटर्न संपूर्ण तालुक्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शेवटी डॉ. अभिजित मुळे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.यावेळी उपस्थित असलेले शिक्षण विस्ताराधिकारी अनिलकुमार यांनी देखील वाघमारे व वाळुंज सरांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. ते म्हणाले की, या गावात असलेल्या संधीचे शिक्षकांनी सोनं केलं आहे आणि स्वतःचा एक वेगळा दर्जा निर्माण केला आहे. यापुढे जाऊन त्यांनी आश्वासन दिले की, शाळेत परसबाग आणि स्वच्छतेचे धडे अधिक चांगल्या प्रकारे गिरवण्यासाठी आम्ही स्वतः देखील या ठिकाणी स्वच्छतेसाठी श्रमदान करायला येऊ. हा भव्य आणि ऐतिहासिक सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती (SMC), ग्राम शिक्षण विकास समिती, माता समितीचे सर्व पदाधिकारी आणि समस्त ग्रामस्थांनी अहोरात्र परिश्रम घेतले. यावेळी सरपंच बाबासाहेब चव्हाण, महेंद्र गंडे, कैलास चव्हाण, योगेश चव्हाण, समीर राजपूत, किसन मरमट, अनिल चव्हाण,सतीश शेजुळ, दिलीप मुळे, भगवान वाघ, गोकुळ वाघ, दिलीप बैनाडे, जादुसिंग बैनाडे, योगेश जैस्वाल, अंशराज जैस्वाल, बाळासाहेब चव्हाण, राजू बारवाल, संजय बिलवाळ, धोंडूभाई शेख ,आदींसह संपूर्ण गावातील आबालवृद्ध, महिला, नागरिक व जागरूक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सिद्धनाथ वाडगावच्या या 'म हाक्रांती'मुळे ग्रामीण शिक्षणाला एक नवी आणि आश्वासक दिशा मिळाली आहे.

# डायघर गुरुकुल शाळेसमोरील अरुंद रस्ता धोकादायक

## पावसाळ्यापूर्वी स्लॅब टाकण्याची ग्रामस्थांची मागणी

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१५, डायघर गांव, (ठाणे) : डायघर गावातील गुरुकुल स्कूलसमोरील गटारावरील अरुंद रस्ता शालेय विद्यार्थी आणि नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करत आहे. पावसाळ्यापूर्वी येथे काँक्रीट स्लॅब टाकून रस्ता रुंद करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जोर धरू लागली आहे.

**विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका**

सदर रस्ता अत्यंत अरुंद असून बाजूलाच मोठे गटार आणि कचऱ्याचे ढीग आहेत. याच रस्त्यावरून दररोज शेकडो शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ तसेच दुचाकी-चारचाकी वाहनांची वर्दळ असते. वाहतूक कोंडीच्या वेळी तर परिस्थिती अधिकच गंभीर बनते. पावसाळ्यात गटार तुडुंब भरून वाहू





लागल्यास लहान मुलांचा तोल जाऊन मोठा अपघात होण्याची भीती ग्राम स्थांनी व्यक्त केली आहे.

फोटोमध्ये स्पष्ट दिसते की, रस्त्याच्या एका बाजूला उघडे गटार आणि कचऱ्याचे साम्राज्य आहे. विद्यार्थी, महिला आणि दुचाकीस्वार जीव मुठीत धरून या रस्त्यावरून ये-जा करत आहेत. गुरुकुल स्कूलचे फलकही याच रस्त्यावर दिसत असून शाळेची वेळ संपताना येथे मोठी गर्दी होते.

**ग्रामस्थांची ठामपा दिवा प्रभाग समितीकडे मागणी**

डायघर ग्रामस्थांनी दिवा प्रभाग समितीकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पावसाळा तोंडावर आला आहे. एखादी दुर्घटना घडण्याआधीच प्रशासनाने जागे व्हावे. गटारावर तातडीने मजबूत काँक्रीट स्लॅब टाकून रस्ता सुरक्षित करावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थ करत आहेत.

या अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीची कोंडी तर होतेच, शिवाय पादचाऱ्यांना चालण्यासाठी जागाही उरत नाही. विशेषतः शाळा सुटल्यावर विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा कळीचा मुद्दा बनला आहे.

प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करावी, अन्यथा मोठा अनर्थ घडू शकतो, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# थोडक्यात

## बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त शहापूरात विध्यार्थ्यांचा भव्य सत्कार



अक्षराज : रविंद्र खाडे

दि.१५, शहापूर (ठाणे) : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहापूर तालुक्याच्या वतीने रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाची प्रस्तावना तालुकाप्रमुख कुलदीप धानके यांनी केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, जिल्हाप्रमुख केदार दिघे आणि उपजिल्हाप्रमुख शंकर खाडे यांनी शैक्षणिक यशासोबतच सामाजिक भान, शिस्त आणि कठोर परिश्रम यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

या प्रसंगी भिवंडी लोकसभा क्षेत्र जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, सहसंपर्कप्रमुख सोन्या पाटील, उपजिल्हाप्रमुख शंकर खाडे, तालुकाप्रमुख कुलदीप धानके, महिला आघाडी जिल्हा संघटिका रश्मी निमसे, तालुका संघटिका गुलाब भेरे, ज्येष्ठ नेते रमेश जगे सर, आदिवासी सेल जिल्हा संघटक जानू हिरवे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे, विधानसभा संपर्कप्रमुख मिलिंद देशमुख, विस्तारक गणेश अवसरे, दत्ताशेठ ठाकरे, मधुकर वेखंडे, रविंद्र खाडे, रमेश विशे, मा. सभापती. जगन पष्टे,हेमंत मोरे, चिंतामण जाधव, संजय सुरळके, विलासशेठ पाटील, बाळू विशे, स्वप्निल भेरे, नामदेव हरणे, भास्कर भोईर, बारकू वाघ, दिलीप कुडव, वामन कुडव, राम शेलार, प्रकाश डोंगरे, बाळाराम तरणे, काळुराम बांगर, शहरप्रमुख विजय देशमुख, बाळा निमसे, शरद मोगरे, महिला उपतालुका प्रमुख चित्रा विशे, अश्विनी वारघडे, युवासेना जिल्हायुवाधिकारी स्वानंद शेळवले, तालुका युवाधिकारी महेश दिनकर, गणेश चौधरी, हर्षल राऊत यांच्यासह शिवसेना, युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, फाईल, बॅग देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणा देण्याचा हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवसेना प्रसिद्धी प्रमुख प्रकाश फर्डे यांनी केले.

## धनोजे कुणबी मध्यवर्ती समितीच्या अध्यक्षपदी संजय ढवस तर सचिवपदी पवन राजूरकर यांची निवड



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१५, चंद्रपूर : धनोजे कुणबी समाजाच्या मध्यवर्ती समितीची निवडणूक नुकतीच धनोजे कुणबी समाज मंदिर चंद्रपूर येथे पार पडली असून सर्व धनोजे कुणबी समाज मंडळ या समितीशी संलग्न असून जवळपास २५ मंडळ या समितीशी संलग्न आहे. दि. १४ जुन रोजी पार पडलेल्या सभेत समाज उपयोगी विविध कार्यक्रमांची व समाज बांधणीची रूपरेषा आखण्यात आली. सोबतच जुन्या कार्यकारणीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने नव्याने कार्यकारणीचा स्थापना करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून चंद्रपूर समाज मंडळाचे उपाध्यक्ष संजय ढवस तर सचिव म्हणून गडचांदूर समाज मंडळाचे अध्यक्ष पवन राजूरकर यांची निवड करण्यात आली.

त्याचबरोबर मार्गदर्शक म्हणून अॅड.पुरुषोत्तमजी सातपुते तर सल्लागार श्रीधरराव मालेकर, मनोहरराव पाऊणकर, चंद्रपूर, दौलतराव भोंगळे, राजुरा यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर कोषाध्यक्ष अनिल धानोरकर, भद्रावती, उपाध्यक्षपदी मधुकरराव ढोके, नागपूर, पांडुरंग टोंगे, भद्रावती, अॅड. संतोष कुचनकर, यवतमाळ, रामकृष्ण ताजने, गडचिरोली यांची निवड करण्यात आली तर सहसचिव म्हणून संजय महाजन, पांढरकवडा, श्रीधरराव फटाले, बल्लारपूर, मुकुंदराव लोडे, बुटीबोरी, अॅड. प्रफुल आस्वले, गोंडपिपरी यांची निवड करण्यात आली. महिला प्रतिनिधी म्हणून मनीषाताई बोबडे, चंद्रपूर, मनीषाताई नागपुरे मार्डी यांची निवड करण्यात आली.

तर कार्यकारणी सदस्य म्हणून अॅड. गजाननराव बोढाले, वरोरा, किशोर निबुदे, घाटंजी, मंगेश रासेकर, वणी, राहुल ठाकरे, यवतमाळ, सुनील देरकर, कोरपना, युवराज वासाडे, सौन्सर, राहुल ठाकरे, यवतमाळ, केशवराव जीवतोडे, विरूर स्टेशन, राजू घुगल, सावनेर यांची निवड करण्यात आली. त्याचप्रमाणे सर्व मंडळाचे अध्यक्ष, सचिव, उपाध्यक्ष किंवा त्यांनी निर्देशीत केलेले पदाधिकारी हे पदसिद्ध सदस्य राहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

## आरक्षण उपवर्गिकरणाच्या मागणीसाठी निघालेल्या महा पदयात्रेचे मुखेडमध्ये जंगी स्वागत



अक्षराज : अशोक लोणीकर

दि.१५, मुखेड (नांदेड) : मुखेड शहरात १४ जुन रोजी दुपारी २ वाजता या पदयात्रेचे आगमण होताच शहरातील अण्णाभाऊ साठे स्मारक येथे ढोल ताशाच्या गजरात भव्य स्वागत करण्यात आले.

अनुसुचित जातीचे आरक्षण उपवर्गिकरण करण्यात यावे या मुख्य मागणीसाठी दि.११ जुन २०२६ पासुन धर्माबाद पासुन मुंबई अशी पदयात्रा काढण्यात आली आहे. ही पदयात्रा मुखेडमध्ये दाखल होताच ढोल ताशाच्या गजरात आणि जल्लोशपुर्ण वातावरणात तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी पदयात्रेत सहभागी झालेले प्रा.डॉ.रामचंद्र भरांडे माजी नगराध्यक्ष गपतराव गायकवाड, नारायन गायकवाड, सखाराम बा-हाळीकर, भारतीय लहूजी सेनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष रणजित बा-हाळीकर, मास संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष नितीन तलवारे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. या स्वागत रलीचे आयोजन माजी नगराध्यक्ष गणपत गायकवाड, दिलीप देवकांबळे, व्यंकट सोमवारे, एम.एम.गायकवाड यांनी केले.